## प्रकरण चार

# चारुता सागर चित्रित स्त्री समस्या आणि उपाय

# प्रकरण चार

# चारुता सागर चित्रित स्त्री समस्या आणि उपाय

**प्रस्तावना :-**

स्त्रीला अबला म्हणून समाजात हीन दर्जाची वागणुक दिली जात आहे. तिचे जीवन चूल आणि मूल यातच गुंतवून ठेवले आहे. सासरी नांदायला आल्यापासून ते मरे पर्यंत घरातील पुरूष मंडळीची सेवा हेच तिचे जीवन आहे. सासूचा लहरीपणा, नवऱ्याचा व्यसनीपणा, मुलाबाळांचे हट्ट हे सर्व सांभाळताना तिच्या मनाचा, भावनांचा ऱ्हास होतो ती एक यंत्रवत जीवन जगते. दुसऱ्यासाठी खपते, परंतु तिच्या जिवनातील समस्या संपत नाहीत.

स्त्रिच्या वाट्याला आलेले जीवन शहरी असो की ग्रामीण, स्थिर असो अथवा भटके, गरीब असो अथवा श्रीमंत तिच्या जीवनात समस्या या आहेतच त्यांच्या दुःखाची जात एकच आहे. याबाबत महावीर जोंधळे म्हणतात, "खेड्यापाड्यात राहणाऱ्या महिलांच्या पदरात पडलेल्या दुःखाची जात एकच आहे, मग त्या स्त्रिया कोणत्याही जातीपातीच्या असोत, कोणत्याही देवाला अथवा देवीला भजत असोत, किंवा अंगावरील कपडयांची विविधता कोणत्याही स्वरुपाची असो, त्यांच्या दुःखाची जात कुळी पुरुषप्रधान संस्कतीने एकाच साच्यात निर्माण केल्याने आजही ती परावलंबी आहे. ती भोगवस्तू म्हणूनच आजही नजरेत भरते किंबहुना तसेच समाज जीवनातील घटकांनाही हवे असते. या हवेपणातून, हावरेपणातून आणि सुखलोलुपवृत्तीतून तिच्यावर होणारे अत्याचार महाभयानक असतात. "[१]

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीचे अधिकाधिक शोषण कसे होईल हाच विचार पुरुष मनात रुजलेला आहे. त्यामुळे तिच्या वाट्याला अनेक समस्या येतात. या समस्यांचा व त्यावर चारुता सागरांनी सांगितलेल्या उपायांचा शोध सदर प्रकरणात घ्यावयाचा आहे.

## स्त्रीजीवनात मुलांच्या भूकेमूळे निर्माण होणाऱ्या समस्या आणि उपाय -

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या प्रमुख प्राथमिक गरजा आहेत. यातील अन्नासाठी माणूस कोणतीही गोष्ट करायला तयार होतो. भूकेची वेदना माणसाला स्वस्थ बसून देत नाही. ती भागवण्यासाठीच जगातील साऱ्या उलाढाली सुरु आहेत.

'बुद्धवाडयातील भूक' या कथेमध्ये बुद्ध झाल्यापासून साऱ्या महारवाडयानं गावकी सोडली त्यामुळे गावात कणी फिरकू देत नव्हत, का शेतमळयाच्या बांधाला उभं राहू देत न्हवतं.

यामुळे बयापुढे पोरांच्या पोटाचा प्रश्न निर्माण झाला. पोरं रडली रडली. बसल्या जागी डोळ मिटून पडली. सकाळपासून भाकरी भाकरी करत होती त्यांना एखादा तुकडा सुद्धा तिला देता आला नव्हता. गावभर भटकून आली पण कुणी गरज केली नाही का मागून कुणी वाढलं नाही. गेली तशी रिकाम्या हाती परत आली. पोरांची आतडी कोवळी ती कळवळून आईला म्हणाली, "आयो, भुका लागल्यात गं! कायतरी खायला दे, लई लई भुका लागल्यात!" [२] आणि त्यांनी भकाळी गेलेली पोट आईपुढं बडवली. तेव्हा ती उद्वेगाने म्हणाली "खावा मलाच!"

भूक कथेतील धनव्वान ताणप्या पोराच्या तोंडात थानं दिल होत. दूध तर येतच नव्हतं पण त्याच्या तोंडाच्या ओलाव्यानं थानं ओल झाल होत. सय होईल तस चोखत होत. आपल्या नशीबाच्या रड्यासंग त्याचं रडं नसावं, म्हणून ते पिसं थानं तोंडात दिल होत.

केऱ्या नामाकडं गेला होता त्यानं भाजणारी भाकरी नामाच्या घरात बघीतली होती. भाकरीच्या वासानं त्याची वखवखवलेली भूक. आईच्या पाठीवरचा उघडा भाग तो जिभेने चाटू लागला. त्याचा राखटपणा चवदार लागला आणि दात त्यावर घट्ट रोवले तशी ती ओरडली, "मुड्द्या, मला खातूस काय? " [३]

धनव्वा इतकी वैतागली होती तीनं तीन चार रट्टे लावले असते; पण तीनं तसं केल नाही. चार दिवस झाले पोरांच्या पोटात अन्नाचा कण नाही. ही तिची समस्या.

स्त्री जीवनातील मुलांच्या भूक समस्येवर चारुता सागरांनी खालील उपाय सांगितले आहेत.

बया आपल्या पतीला परसाला म्हणते, "तेवढं पाटलाचं रेडकू टाका जावा वडून आन् आना जावा पोटापूरतं मागून. न्हाईतर ही पोरं मला रातभर झोपून दयायची न्हाईती." [४]

यावरुन धर्मांतर केले तरी पोटाचा प्रश्न शिल्लक राहतो याचे आत्यंतिक वेदना देणारे दुःख चारुता सागर चित्रित करतात.

काल धनव्वा फिरुन आली. परवा आलीः पण कुणी मापटं चिपटं सुद्धा दाणं पदरात टाकलं नाहीत. सगळं मार्ग खुंटल, तेव्हा ती नवऱ्याला म्हणते, "आवं बघा जावा कुठं तरी पसा मापटं. पोरं बघा कशी कराय लागल्याती. " [५]

' बुध्दवाडयातील भूक ' आणि ' भूक ' या दोन्ही कथांत दारिद्रयाचे चित्रण येते.

## स्त्रियांच्या जीवनात प्रेमसंबंधामुळे निमार्ण होणाऱ्या समस्या आणि उपाय :

प्रेम ही जगातील सर्वश्रेष्ठ गोष्ट. त्यासाठी वाटेल तो त्याग करायला स्त्री तयास असते. या प्रेमाच्या आड जात, धर्म, कुळी, गरीब-श्रीमंती अशा अनेक गोष्टी येतात; परंतु जेथे दोन मने एकत्र येतात त्या शक्तीपुढे या सर्व गोष्टी तुच्छ ठरतात.

'निवाडा' कथेतील नंदीवाल्या जमातीतील धुरपाच्या बापाची कुळी हलकी त्यामुळे आप्पानाच्या बापान लग्नाला नकार दिला ही गोष्ट धुरपाच्या बापाच्या कानावर गेली अन् पटकन धुरपाच लगीन आटोपल.

त्यांना कळत असं दोघांचा एकमेकावर बसलेला जीव. दोघांनी घेतलेल्या आणाभाका. लहानपणा पासून ठरवलं काय आणि झालं काय. पुढच जगणं तर एकमेकावाचून अशक्य. आता तर लगीन झालेल. ही धुरपाची समस्या.

'ढोलगं' कथेतील शेवंता डोंबारणीचं लग्न ठरवण्यासाठी तिचा बाप भुजिंगा डोंबाऱ्याकडं घेऊन येतो भुजिंगाचा मुलगा बाबल्य पसंत पडतो. रात्रीच्या वेळी खेळाचे नियोजन होते. खेळ पहायला तोबा गर्दी याच गर्दीत शेवंतीला जगण्या दिसतो. त्यानं तिला भैरूबाच्या जत्रत तारेवरचे खेळ करताना खाली कोसळताना वाचवल आहे. त्याला शेवंती हवी आहे परंतु त्याच चारीचालीच वागणं शेवंताला पसंत नाही. बाबल्या तारेवरचा खेळ करीत असताना जगण्या तार तोडतो मग तर

आपणाला शेवंती मिळेल. या घटनेत बाबल्याचा एक पाय व बरगडी तुटते. शेवंतापुढे समस्या निर्माण होते पाय मोडलेल्या बाबल्याशी लग्न करायाचे.

स्त्री जीवनात प्रेमसंबंधामुळे निमार्ण होणाऱ्या समस्यावर पुढील उपाय चारुता सागरांनी सांगितले आहेत.

माहेरी आलेली धुरपा एका रात्री आप्पांना बरोबर पळून जाते तर प्रेमापोटी शेवंती पाय मोडलेल्या बाबल्याबरोबर लग्नाला तयार होते व त्याच्याबरोबर संसार करते.

## स्त्रियांनां मूल असणे, होणे, नसणे यातून निमार्ण होणाऱ्या समस्या आणि उपाय :

मूल असणे. होणे. नसणे. हे तीनही भाग दुःखाचा पाऊस अंगणात पाडून जाणारे आहेत. 'मामाचा वाडा' तील दुःखाची जात ही सर्वत्र आढळून येणारी आहे. मूल नाही म्हणून दुःख, तर मूल झाल्यानंतर त्याला मोठं करण्यासाठी सोसाव्या लागणाऱ्या यातना याही फक्त स्त्रियांनीच भोगायच्या असतात. पुरूष निमित्तमात्र. बायकोने जन्म दिलेल्या पोरावर अधिकार सांगणारा. हीच वृत्ती 'मामाचा वाडा' या कथेत बघायला मिळते. मुलबाळ नसेल तर पुरूषापेक्षाही बाईला होणारे दुःख हे अतिशय गहिरे आणि खोलावर जाऊन घर करून बसलेले असते. [६]

'मामाचा वाडा' या कथेतील मामीला मुल झालच नाही त्यामुळ तिला लहान मुलाच भलतं वेड मुलं पाहिल, की तिला दिवा स्वप्न पडत. मुलं, लहान लहान मुलं, गोडव्या अंगाची, जावळ्या केसांची. अवतीभोवती रांगत असलेली मुलंच मुलं. कोणतं उचलू. कोणत नको, असं होई. ती हात पुढं करी. मुल उचलून छातीस हात लावी.

यातूनच तिच्या मनात एक पोकळी निमार्ण झाली. त्यात ती कणाकणानं विरत गेली. नजर दिशाहीन झाली. तिचा चेहरा उदास होऊ लागला ही तिचा समस्या.

याउलट याच कथेतील यमनीला एक सोडून तीन पोरी झाल्या; पण तिला हवा आहे तिच्या वंशाचा दिवा तिचा वंशवेल वाढवणारा. ही तिची समस्या.

स्त्रियांना मूल असणे. होणे. नसणे या समस्यावर चारून सागरांनी पुढील उपाय सुचविले आहेत.

दुपारच्या वेळी मामी लहान निवेदकाला पदराआड घ्यायची. छातीला लावायची. नुसती कोरडी छाती; पण मामीला वाटायचं, आज ना उदया आपल्याला दूध फुटेल. त्यातून कदाचित गर्भही ओलावेल. दोन-बारा वर्सांनी आपली ननंद नाही का पोटीशी राहिली?

यमनीनं नवऱ्या देखत तीनही पोरींची नरडी दाबली व त्याला म्हणाली, 'जा, मातीत एवढी रांड मातीत गाडून ये, जा! या राडांची उसाभर माझ्यान न्हाई व्हायची, झालं पोरगं, तर सांभाळीन, न्हाई तर अशी राहीन!' अशा प्रकारचा निश्चयी उपाय चारुता सागर यमनीच्या उद्‌गारातून सांगतात.

## स्त्रियांच्या जीवनात दागिने, पैसा व सौंदर्य यातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि उपाय

स्त्रिच्या जीवनात समस्या निमार्ण करणारी गोष्ट म्हणजें तिचे सौंदर्य, दागिने व पैसा. सौंदर्यामुळे तिच्यावर अनेक पुरूषांच्या नजरा खिळतात. दागिन्यांसाठी तिला लुटली जाते, तिचा छळ केला जातो; तर पैशासाठी सासरची माणसे नांदणे तोडतात या समस्येच्या चक्रात 'ओटी' कथेतील अक्का सापडली आहे.

नुकतच लग्न होऊन माहेरी आलेल्या ताईच्या घरावर डाका पडला. त्यामध्ये ताईच्या अंगावरील जिनसा देखील लुटल्या गेल्या. ताई माहेरी नांदायला गेली परंतु सुनेच्या अंगावर जीनसा नाहीत ही गोष्ट सासूच्या नजरेतून सुटली नाही तिनं पती व नुलाच्या कानावर ही गोष्ट घातली. ताईनं काकुळतीन सर्व कहाणी सांगितली तेव्हा सासू उपरोधान म्हणाली, 'अग, त्या जिनसांचं अजून पैसेही दिले नाहीत. तोवर तू गेलं म्हणतेस, तर कसं?'

" ते काहीही असू द्या, उदयाच्या उदया गाडी जुपा आणि सोडून या तिच्या बाच्या घरात आणि त्याला बजावून सांगा, अशांन पोरीच नांदणं न्हाई व्हायचं, एक तर जिनसा द्या न्हाई तर त्याचं पैसं. त्याशिवाय आम्ही नांदविणार न्हाई. पोरगी अशी पडून राहोल. आणि तुलाही सांगून ठेवते, पोरी, जिनसा घेऊन आल्याबिगर या घरच्या उंबऱ्याची पायरी चढायची न्हाई! " [७]

दागिन्यासाठी ताईच नादंण तुटलं ही तिची समस्या.

'वाटमारी' कथेतील नुकत लग्न झालेली सत्यवती भाऊ गोविंदाबरोबर सासरी निघाली होती. भिवघाटातून जात असताना पाच बापयांनी तिच्या भावाची बैलगाडी अडवली गोविंदाकडे त्यांनी दागिन्यांची मागणी केली. गोविंदाने दागिने दिले परंतु दागिने घेऊन त्यांनी गोविंदाचे हातपाय बांधून टाकले व सत्यवतीला घेऊन गेले.

रात्र झाली. पाचांच्या पाशवी नजरा तिच्यावर खिळल्या. रानाप्पा टोळीचा म्होरक्या. तो चौघांच्या झोपेची वाट पाहू लागला. सत्यवती विचार करू लागली -

यातूनं आता आपली सुटका? हातापायाची सारी शक्ती गमावली. अब्रू मातीच भांडं. तडा गेला की संपलं. या पुढील मार्ग? काळीकभिन्न रात्र... कसा करायचा प्रतिकार. भुकेलेली श्वापदं जशी भक्ष्यावर तुटून पडतात. मांसाचा लचका तोडतात अशी आपल्या देहाची अवस्था. स्त्रीदेहाची विटंबना....

'बाबा मला क्षमा करा?' या कथेतील उमाला २६ वर्षे झाली तरी लग्न जमत नव्हत. बघायला आलेले पाहूणे परत येतो म्हणून सांगत; पण येत नसत. उमाच्या वयाला लोक बुजू लागले.

ज्यांच सगळ ठिक होत त्यांना एक नंबरची मुलगी हवी असे आणि चार आकड्यात हुंडा. उमा तर जेमतेम देखणी आणि सार अवघ्या पाश्यात व्हावं ही वडिलांची इच्छा.

ज्यांना उमा पसंत असे ती स्थळ उमाच्या बाबांना पसंत नसत. लग्नाच्या मोसमात प्रत्येक तिथीला गावात ३-४ लग्ने होत. तिला सनईचे सूर बेसूर वाटू लागले घरी एकूलता एक भाऊ लग्नाचा झालेला. घरात उपवर बहीण असताना तो कसा लग्न करील? ही उमा समोरील समस्या. ती म्हणते, "घरात बारा बैल खपतील. मात्र एक मुलगी खपणार नाही. ही एका स्त्रीजातीची शोकांतिका आहे. " [८]

दागिने, पैसा, सौंदर्य यामुळे स्त्रीच्या जीवनात निमार्ण होणाऱ्या समस्यावर चारुता सागरांनी पुढील उपाय सांगितले आहेत.

ताईच्या वडिलांनी सासरच्या लोकांची समजूत काढली; पण सासरची माणसं माणसापेक्षा व्यवहाराला जपणारी तेव्हा ताई म्हणते,

"आबा, नाहीत नांदवत, तर राहू दे. मुलगी नव्हं, मुलगा म्हणून तुमच्या घरात राहीन. " [९]

स्वाभिमानी ताई बापाच्या घरी येऊन राहते व त्यांना शेतीकामात मदत करू लागते.

एके रात्री उमा उशीखाली पत्र लिहून ठेवते ती त्या पत्रात म्हणते, 'आई! तुझ्या सुनेची जागा मी अडवून ठेवली, तर बरं दिसले का ते? आता एक छानशी सून आण. पण सुनेचे पैसे मात्र घेऊ नकोस, आणि रूपावर पण फारशी भिस्त ठेवू नकोस!'..... आणि उमा विहीर जवळ करते.

सत्यवती सर्वांचा डोळा लागलेला पाहून अंधाऱ्या रात्री वाट चालू लागते व पहाटे एका मेंढक्याच्या मदतीने आपला जीव वाचवते व चारित्र्याच रक्षण करते.

## स्त्री जीवनात सासुरवासातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि उपाय :

स्त्री जीवनाला सासुरवास हा एक कलक आहे. प्रत्येक स्त्रीच्या जीवनात सून आणि सासूची भूमिका येतेच; परंतु सासू झाल्यावर ती आपल्यातील सून विसरते व तिच्यातील सासू जागी होते. सूनेच्या प्रत्येक कामात तिला चुका दिसू लागतात. यातूनच भांडण - तंटा निमार्ण होतो व संघर्ष विकोपाला जातो या परिस्थितीत एखादी सून सहन करते तर एखादी जीवनाचा अंत करते.

'किंकाळी' कथेतील ऐरावतीला पहिल्यापासूनच सासूनं पटवून घेतल नाही. सासू सारखी भांडायची, शिव्या दयायची, कधी कधी चार - चार दिवस तोंड मिटून बसायची याला अगदी शुल्लक कारणही पुरत असे. स्वतःला बसलेली बोलणी ऐरावतीला विसरायची;पण आईबापावरून बसलेली बोलणी तिला विसरत नसत.

एक दिवस धुणं धुवायला गेल्यानंतर ऐरावतीच्या पायातली जोडवी पडली. सासून ऐरावतीच्या दंडाला धरलं. दरा दरा ओढून घराबाहेर काढंल. आणि म्हणाली, "पहिली जोडवी आण आणि मगच घरात ये. परवा तांब्या टाकलास. आज जोडवी टाकलीस. उद्या डोरलं टाकशील, तू एक असशील तालीवाराची. पर मी न्हाई. पसा कुडत्यान ह्यो संसार जोडलाय. तुला काय सगळं टाकून मोकळी होशील, काय बाच्या घरातनं आणय लागतंय. " [१०]

बाळंत झालेल्या स्त्रीया तीन तीन महिने बाजे वरून उठत नाहीत. अंगात थंडी मुरेल म्हणून सहा सहा महिने पायातले काढत नाहीत. 'धुणं' कथेतील रामू वाण्याची भागू बाळंत झाली; परंतु तिला साथ ना सासूची ना इतर कुणाची. आईला बोलवाव म्हटल तर सासूचा बोल, "मी काय डोस्क्यावर बिबं कडवून वतत हुती व्हयं. 'आईला बोलावून आणलीया.' तिकडं लावून दया म्हटलं. ते बी न्हाई. काय कवा बी एकदा मरायचं हाई! " [११]

स्त्रियांच्या जीवनातील सासुरवासामुळे निमार्ण होणाऱ्या या समस्यावर चारुता सागरांनी पुढील उपाय सांगितले आहेत.

ऐरावतीन सुब्याला व राजीला बरोबर घेतलं व जक्काण्णांच्या विहिरीत उडी मारली. तर रामू वाण्याच्या भागूचं अंग पाढंर फटफटीत पडलेलं. हातापायाच्या काड्या झालेल्या. तेला अभावी कोरडे पडलेले कसे व अंगाभोवती गुंडाळलेली एक चिंधी. ही ओल्या अंगाची बाळंतीण दाहाव्या दिवशी नदीला धुवायला आली. थंड पाण्यात उभी राहिली. दोन्ही हातांनी धुवायला लागली.

## स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची समस्या आणि उपाय :

समाजात स्त्रियांना अबला बनवून तिला दासी केले आहे. तिचा शारीरिक उपभोग ही तर पुरूषांची मक्तेदारीच. त्यामुळे स्त्री जीवन हे पुरूषी सत्तेखाली भरडून निघाले आहे. पुरूषांची सेवा करणं. त्यांच्या सुखासाठी जीवन वाहन हे स्त्रीचं जीवन बनलं आहे. समाजाची बंधने झुगारून स्त्री देहाचा पुरूषांनी हवा तसा उपयोग घेतला आहे. यातूनच स्त्रियांच्या जीवनात अनेक समस्या निमार्ण होतात तिला जगणे अवघड होते. समाजात उजळ माथ्याने फिरणे अवघड होते आणि यातूनच तिला जिवनाचा अंत करावा लागतो.

उदा. 'मामाचा वाडा' कथेतील राधी जन्मापासूनच करंटी. तिच्यापाठीवर आईला एक मुल झाल आणि ते आईला घेऊन गेल. राधीचा संभाळ बापान केला. तिच लग्न लावून दिलं परंतु राधी नवऱ्याजवळ नादंली नाही. वाटल्यास संभाळ नाहीतर विहिरीत ढकलून दे पण त्या घरात मला नांदायच नाही; ' म्हणून राधीनं भल्या पहाटे बापाच घर गाठलं.

राधी गुरवाला कामात मदत करू लागली परंतु नवरा सोडून राहिलेल्या राधीनं गुरवापुढं वेगळच वाढून ठेवल. तिच्या पोटात गर्भ अंकुरू लागला ही बातमी साऱ्या गावभर झाली. राधीला गावात तोंड दाखवण कठीण झालं ही बातमी मामाच्या कानावर घालताना रामा न्हावी म्हणतो,

म्हणतेत, "राधी पोटीशी हाई. केली आसंल कुठतरी इरड. देवाचं जितराप त्याला दावं का फावं!"[१२]

आशा प्रकारची बोलणी समाजाकडून त्या अत्याचारीत स्त्रीला सहन करावी लागतात या समस्येचे वास्तव चित्रण चारुता सागरांनी केले आहे.

'अव्यक्ता' कथेतील आक्काचा पती एका भल्या पहाटे तिला सोडून गेला. ती त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली अनेक दिवस नि पुन्हा वर्षे मोजली.

आक्कांच्या घरात चार माणस एक सासरा, दोन लहान दीर, स्त्री म्हणून आक्का. ऐन विशीतल वय! बापय माणसाच्या घरात दिवस कसातरी निघेलं; पण रात्र कशी काढायची? जग तरी काय म्हणेल? माणसं एक आपली खरं, माणसाची मन? म्हणून ती शेजारच्या तेरा - चौदा वर्षाच्या अंतूला झोपायला बरोबर घेते.

अशीच दोन वर्षे गेली. अंतू नेहमीसारखा आक्काकडे झोपायला निघाला असता आईन विरोध केला कारण आक्का गरोदर होती अन् ही गोष्ट साऱ्या बायकात फुटली होती.

'रैतुना' या कथेतील रैतुना ही रोहिल्याची मुलगी घरंदाज पाटलाच्या घरी खंडणी मागण्यासाठी गेली असता त्याच्या नजरेत बसते. पाटलाच तिच्या पालावरती येणं जाणं वाढतं. यातूनच त्याच्यात प्रेमसंबंध निर्माण होतात.

एके दिवशी पाटलाच्या मळ्यात पारव्याचा बेत होता. रैतुनाचा बाप दारूच्या नशेत अडवा होतो. याचा फायदा घेऊन पाटील रैतुनाचा उपभोग घेतो व लग्न करण्याचे वचन देतो.

रैतुना पाटलाच्या शब्दावर विश्वास ठेवते परंतु पाटलाच्या आईच दुखणं बळावत आणि आईची शेवटची इच्छा म्हणून बहिणीच्या मुलीशी लग्न कराव लागत.

त्यानंतर दोन महिन्यांची गोष्ट. रैतुना पाटलाच्या वाडयावर गेली असता पाटलाच लग्न झाल्याची बातमी तिला रामू गड्याकडून समजते. ती तेथून लगेच निघून जाते.

नेहमीप्रमाणे रैतुनाचा बाप खंडणी मागायला आला तेव्हा पाटलान दबकत दबकत विचारल,

'पोरीचं लग्नं केलसं काय?'

यावर रोहिला म्हणाला, " कशाला, पटेल, लगीन? जातीला बट्टा लावला तिनं, पोरगी वाईट निघाली. कवा आमच्यांत असं होत नाही लग्नाअगोदर प्यार वाढवलं. सांग, कुणाच हाई, म्हणून मस्त मारलं. पर काय सांगितलं नाही. मग सगळया जमातींन तिला दिलं पिटाळून. " [१३]

या अत्याचारीत स्त्रीयांच्यावर चारुता सागरांनी पुढील उपाय सुचविले आहेत.

राधीवर अत्याचार करणाऱ्याच नाव सांगायला मामान दोन दिवसाचा अवधी दिला; पण तिसऱ्या दिवशी राधीन विहिरीत उडी घेतली. गावच तोंड बंद केल आणि स्वतःला जनरुढीतून मुक्त करून घेतलं.

'अव्यक्ता' कथेतील आक्कांन एका रात्री अंतूला बरोबर घेतले व रात्रीत माहेर गाठले; आणि 'आई!' एवढाच कसातरी आवाज काढून तिच्या गळी पडली.

समाजान पिटाळून दिलेली रैतुना आपल्याला झालेल मुलं घेऊन जीवन जगते. तिच स्वतःच्या मुलावर तितकच जीवनावर प्रेम आहे.

## स्त्रियांना पती पसंत नसण्याची समस्या आणि उपाय -

प्रत्येक स्त्रीला आपला पती रूपवान, कर्तृत्ववान हवा असतो. जर तिची इच्छा या पतीकडून पूर्ण झाली नाही तर या संसारी जीवनाला अर्थ उरत नाही. सतत रूसणे - फुगणे, भांडण - तंटा निमार्ण होतो. संसारात, मुलाबाळात तीच मन लागत नाही. एकमेकांसाठी आतुर होणारे दोन जीव एकमेकांना टाळू लागतात. यातूनच पुरुष व्यसनी बनतो; तर स्त्रिया वाममार्गाला लागतात. जे सुख आपणाला पतीकडून मिळालं नाही ते दुसऱ्या पुरूषाकडून मिळवण्याचा प्रयत्न करतात.

'पेटलेला क्षण' या कथेतील मालाला तीन पोरं. परिस्थिती अत्यंत गरीबीची. त्यामुळे भिवाला सर्वाचा मेळ घालेपर्यंत नाकीनऊ येते. तो मालाची कोणतीही इच्छा पूरी करू शकत नाही त्यामुळे मालाला भिवा पसंत नाही.

एकदा कामावर गेलेल्या भिवाच्या पायाला कुदळ लागली. तो पाय बांधून घरी आला ते पाहून माला उखडली, ' डोळं गेलं होतं काय? पाय फोडून घेतला. बसा आता डोक्याला हात लावून. बायको धडधाकट! पडतीया सगळया जगाच्या पाया! '

मालाला मुल देखील नको झालेत ती त्यांना म्हणते -

" का इथंच मरताय्? जावा थोडं बाहेर. उलथा जावा. सारखं घरात, घरात आईचं पेकाट धरून बसतायसा! आई कुठं उलथतेय् की काय, कुणास ठाऊक. " [१४]

स्त्रीला पती पसंत नसला की ती किती विषण्ण होते. संसारात तिचे मन लागत नाही जन्म दिलेली मुले देखील नको वाटतात. पती म्हणजे तिला संकट वाटते याचे वास्तव ; पण प्रत्ययकारी चित्रण चारुता सागरांनी केले आहे.

'सावित्री' कथेतील सावित्री आणि तिचा नवरी यात जमीन आस्मानाच अंतर. तो कुठं मुंबई का अहमदाबादला कामाला होता. नात्यातला मुलगा वचन दिलेलं त्यामुळं सावित्रीचं त्याच्याबरोबर लग्न लावलं. सावित्रीन त्याला हळद लावताना मंडपातच पाहिला. त्यावेळी सावित्रीच्या कपाळावर आठी पडली ती कायमची. सावित्री त्याच्या जवळ नांदायला तयार नाही. तो चार-पाच वेळा येऊन गेला; पण सावित्री गेली नाही. गावच्या लोंकानी प्रयत्न केला. त्यांना तिनं एकदाच सांगितल,

" मला साफ नांदाय जायाचं नाही. तुम्हाला जर पाठवून दयायचं असेल तर माझं मढं दयावं लागेल. " [१५]

'असेही दिवस' या आत्मनिवेदनात्मक कथेमधील शिंप्याची बायको अत्यंत रेखीव, नीटनेटकी गौरवर्णाची आणि पहिल्याच दृपिटक्षेपात पुरूषाला खाली बघायला लावणारी. याउलट शिंपी चाळिशीच्या आसपासच्या आणि अंगाण खूपसा सुटलेला. त्यामुळे तिला तो पसंत नाही. ती निवेदकाला म्हणते,

" या संसारात काय रस हाई? दोन पोरं हाईती म्हणून करायचा. " [१६]

स्त्रियांना पती पसंत नसण्याच्या या समस्येवर चारुता सागरांनी पुढील उपाय सुचविले आहेत.

मालाने वामनरावांना जवळ केले. भिवा कामाला गेल्यानंतर भरदिवसा ती वामन बरोबर कामधंदा सोडून अघळपघळ बोलत बसू लागली आणि एके रात्री वामनबरोबर पळून गेली.

माहेरी राहणाऱ्या सावित्रीला आई वाईट वंगाळ बोलली म्हणून तिनं विहीर जवळ केली; परंतु विहिरीत पडलेल्या सावित्रीला मास्तरांनी वाचवले. ती मास्तरांवर प्रेम करु लागली. शय्यासोबत करू लागली.

शिंप्याची बायको निवेदकाला जवळ करते त्याच्यावर जीव लावते. शय्यासोबत करते; आणि संसाराचा मुलाबाळांचा त्याग करून निवेदकाबरोबर दुसरा संसार मांडायला तयार होते.

## स्त्रिच्या वाट्याला येणारी वैधव्याची समस्या आणि उपाय -

स्त्रीचं जीवन हे पुरूषावर अवलंबून आहे. पती हाच स्त्रीचा आधार आहे. तिचा जीवन साथी आहे. तो आहे तोपर्यंत तिच्या कपाळी कुंकू आहे. तिला मान आहे. चार आया - बाया देखील तिला झालेल्या मुला लेकरांच कौतुक करतात. समाज तिच्याकडे वाईट भावनेनं पाहू शकत नाही. तिच्या शिलाची जपणूक समाज करतो.

पण ह्च पती अर्ध्या वाटेत सोडून गेला तर ... तिचे जीवन असह्य बनते. तिला विधवा, काळ्या तोंडाची, पांढऱ्या पायाची म्हणून तिची अवहेलना केली जाते. तिचे तोंड देखील पाहणे समाजात वाईट मानतात. तिच्या शरीराचे लचके तोडणाऱ्या नजरा तिच्यावरती रोखल्या जातात. आशा प्रकारचे जीवन 'निरोप' कथेतील चंपाबेनच्या वाटयाला आले आहे.

चंपाबेनला अहमदाबादला दिली होती; पण ती कमनशिबी. साध टायफॉइडच निमित्त झालं आणि पती महिन्याभरातच निघून गेला. 'नांदायला आली आणि नवऱ्याल टाळून बसली.' हे तिच्या कपाळी आलं. त्यामुळे सासरच्या माणसांनी तिला पिटवून दिली. इकडे चंपाबेनची आई वारली आणि वडिलांनी नवीन संसार उभा केला.

'असेही दिवस' या आत्मविदेनामध्ये एक विधवा भाजीवाली आहे. पती निघून गेला. एक आठ - दहा वर्षाची मूलगी आहे. बाई एकाकी पडलेली. भाजीमंडईत माल खरेदी करायचा आणि दुकानात नेऊन विकायचा हा तिचा उद्योग.

मंडईत माल खरेदी करणं तो आणण यात सकाळी तिची धावपळ होई. तापत्रा होई. हे एकाकी जीवन तिला असहय झाले आहे. तिला कोणाची तरी साथ हवी आहे ही तिची समस्या

'भूक' कथेतील बाबाजी रामोशाच्या आईच्या वाट्याला विधवापण आले. दरोडा टाकायला गेलेला पती मारला गेला. वाटेतचा त्याला पुरून आले. डोळ्यातल पाणी सुद्धा त्याच्या प्रेतावर पडल नाही. रडायची सुद्धा चोरी झाली एकान तोंड आवळून बजावलं, " वैनी, रडायचं नाही. तू रडशील आणि आमच्या हातांत बेडया आडकवशील! बळीला मारणाराचा आम्हांला बदला घ्यायचा आहे! बळीच काय झालं, कोणाला कळता कामा नये, " [१७]

पती निधनाच्या दुःखाला वाट करून देण्यासाठी स्त्रीला रडतादेखील येऊ नये यापेक्षा दुसरे दुःख कोणते? चारुता सागरांनी स्त्री जीवनाची समस्या दुःखाची परमसीमा गाठणारी मांडणी आहे.

रखमाकाकूच्या वाटयाला वैधव्य आल. एक सात वर्षाच पोरग होत. जीवनात त्याचा आधार होता; पण तेही विहिरीत पडलं आता फक्त जपाच्या माळेचं मणी मोजल्या प्रमाण आयुष्याचे मणी मोजत आहे. लग्नात बांधलेल्या गाठीसाठी दैवानं तिच्या कपाळावरचं कुंकू पुसल.

'मामाचा वाडा' या कथेतील मावशीच्या वाट्याला ऐन तारूण्यात रांडपण आलं. मावशीन नवऱ्याचं पुरत तोंडही पाहिल नव्हत. एका वर्षाच्या आतच तो सोडून गेल. तिच्या कपाळाच कुंकूही गेल नव्हत. तोवर तिचा छळ सुरू झाला. तिला कोणी बघेना. खा, जेव म्हणेना. एक अंधार कोपरा धरून ती रडत दिवस काढू लागली. आख्खी रात्र जागू लागली. तनानं, मनानं ती खंगू लागली.

'नागीण' कथेतील अंगाच्या वासानं माजाला आलेली नागीण वेडावली होती. तिच्या वासान नाग धुंदावला होता. हे प्रणयराधनेत धावणार सापाच जुळं बापूच्या नजरेत आलं आणि त्यांन नागीणीचा घात केला. तिच्या जोडीदार सापाला मारलं. नागीणी विधवा झाली ती वेडावून गेली. तिच्या वाट्याला वैधव्य आलं ही तिची समस्या.

या विधवा स्त्रियांच्या समस्यावर चारुता सागरांनी पुढील उपाय सुचविले आहेत -

चंपाबेन बंगल्यासमोरच्या चौकातील पोलीस जगन्नाथच्या प्रेमात पडते. तिने त्याला नोकरीचा त्याग करायला लावला व त्याच्याबरोबर पळून गेली. तर विधवा भाजीवालीन मंडईतील एका हमालाला जवळ केले, तो ही तिला भाजी खरेदी करण्यात, ती दुकानपर्यंत आणण्यात मदत करू लागला. तिनं त्याची सर्व चौकशी केली व एक दिवस सर्व संसार त्याच्या ताब्यात दिला.

बाबाजीच्या आईन नवऱ्यामाघारी दुःख विसरल. पोट बांधल. लोकांची मोलमजुरी केली आणि पोराचा संसार सुखाचा केला.

रखामाकाकूचा पती सोडून गेला. तरीही ती आपल्या पतीवर निश्ठा ठेऊन जगते. पती निधनानंतर देखील एकनिष्ठ राहते. वाट्याला आलेलं वैधव्य स्विकारते. तर रंडकी मावशी आपल रंडकंपण विसरून माहेरी येऊन वाडयाच एक अंग होऊन राहते. तसेच ज्यांन आपल्या जोडीदाराला मारलं त्या बापूच्या जोडीदारणीला चंद्राला ती भेंड्या तोडत असताना नागीण डसली व तीनं बापूला विधूर केलं व आपल्याला विरहात लोटणाऱ्या बापूला विधूर करून त्याचा बदला घेतला.

## स्त्री जीवनातील इतर समस्या आणि उपाय -

स्त्री जीवनामध्ये नैसर्गिक आपत्तीतून, सामाजिक रुढी, प्रथा, परंपरेतून जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षातून विविध समस्या निमार्ण होतात याचेही चित्रण चारुता सागर यांनी केले आहे.

'दर्शन' कथेमध्ये घरातील पहिली मुलगी देवीला सोडायची. तिच्या गळ्यात दर्शन बांधायच ही वंशजांनी पाळलेली वहिवाट. पुतळाच्या गळयात दर्शन बांधल. लग्नानंतर पहिल्या रात्री पुजाऱ्याचा अत्याचार तिला सहन करावा लागला. तिच्या शिणच्या पोरी विचारायच्या, " व्हयं गं, तुला जोगतीण सोडलिया व्हय ?"

गावची पोरं तर त्यापुढचं बोलायची अगदी शेड्यावरचं - "देवाच जितराब. आलं बघा हिंडून. बिनदाव्याचं जनावर कुठंही चरत जायचं. कुणाच्याही वळचणीला थांबायचं. " [१८]

एक दिवस तिला राघू आणि बायना ताफ्यात नेण्यासाठी आले. आजपर्यंत 'आक्क्या जोगया' म्हणत धर्मभिक्षा मागणे तिला काही वाटत नव्हते पण आता तमाशातल्या नाच्यासारखं नाचायच? तिला रडूच कोसळलं.

राघूच्या ताफ्यात तीला शारीरिक विकारवासनेचे अतिशय वाईट अनुभव आले. यातूनच तिच्यापोटी गर्भ अंकुरला तिनं साळगावच्या पुजारणीची मदत घेतली व या कठीण प्रसंगतून मोकळी झाली.

शेवटी तुळसाई माघारी ती महाभक्तीन झाली; परंतु ती आपल्या जीवनाचा विचार करू लागली. - या संसारी लोकांच जीवन कसं वेगळं आहे. नदीला किनारा असल्या सारखं. किनाऱ्यामुळे नदीला नदीपण मिळतं. प्रवाह झुळझुळ वाहतो. अगदी निर्मळ दवबिदूसारखा. स्त्रीलाही असंच संसारामुळं सौभाग्य लाभतं. ती फुलते. फळते तिच्या स्त्री देहाचं सार्थक होतं आणि आपलं आयुष्य? ही तिची समस्या.

'हॉलिडे होम' कथेतील वेश्येच्या पोटी गर्भ अंकुरला. ती बाळंतीन झाली. ना कुणाचा आधार, तिच्यापुढे जगण्याची समस्या उभी राहिली.

'दावं' कथेमध्ये दुष्काळामध्ये कैकांची जनावर मेली. कैकांनी विकली आणि दुष्काळी कामाला मोकळी झाली. हिराच मात्र पोटच्या पोरावर ध्यान कमी पण बैलावर जास्त. घासातला घास घालून मोठी केली; परंतु दुष्काळापुढं तिच काही चालेना. पावणेदोनश्यान कडबा पेंढी. मुठीत मावल एवढया पेंढीला पावणेदोन रुपये. तोही कडबा बाजारात यायचा अवकाश - मला का तुला? घडीभरात मोकळं. खळं लुटलेलं.

दुष्काळामुळे अनेक लोकांनी जनावर कापायला दिली तेव्हा हिराला ही गोष्ट ऐकवली नाही. जित्रापाच्या नव्ह, आपल्याच नरडयावरनं कोणी तरी सुरी फिरवतयं अस तिला वाटलं. दुष्काळापुढे काही चालेना तेव्हा बळी हिराला बैलं विकावी म्हणतो. तेव्हा तो आपल्या काळजाचा घड कापतो असं वाटलं. तेव्हा ती म्हणते,

"माझी बैलं बाजारला न्यायची नाहीत.पोटच्या पोरासारखी मी ती सांभाळलेत.तुम्हांस्नी काय?"[१९]

'पुंगी' कथेतील खाला व अलिखा या गरूड्याच्या जोडप्याचा सरदाऱ्या हा साप अचानक मरतो त्यामुळे अलिखा अतिशय दुःखी होतो. सर्व भाऊबंद अलिखाला सोडून पुढच्या गावी निघून जातात. खला आपल्या पतीची समजूत काढते.

नवीन जनावर शोधण्याचा ते निश्चय करतात आणि सरदाऱ्याहून सरस जनावर त्यांना सापडत; पण ते पकडताना अलिखाला दंश होतो आणि यातच त्याचा शेवट होतो. खलापुढे प्रश्न निर्माण होतो. आपल्या पतीला संपवणाऱ्या सापाला सांभाळायचा का त्याला संपवून आपल्या दुःखाचा बदला घ्यायचा?

सामाजिक, आर्थिक, नैसर्गिक समस्येतून स्त्री जीवनामध्ये निमार्ण होणाऱ्या विविध समस्येवर चारुता सागरांनी पुढील उपाय सांगितले आहेत.

पुतळा पुढील पिढीतील रूक्कीच्या गळयात दर्शन बांधत नाही. ती रुक्कीची या देवदासी परंपरेतून मुक्तता करते. तर 'हॉलिडे होम' कथेतील वेश्या स्त्रीला जगण्यासाठी महिन्या दिड महिन्यात देह विक्रयाला तयार व्हावे लागते आणि दुष्काळात आपली बैल जगावीत ती आपल्या दावणीला रहावीत म्हणून हिरा पतीला आपल्या गळ्यातील सौभाग्यलंकार काढून देते व त्या पैशातून वैरण आणण्यास सांगते.

गारूड्याची खला आपल्या पतीच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या सापाला मारू शकत नाही कारण तोच तिच्या मुलाबाळांच्या जगण्याचा आधार आहे.

## समारोप :

चारुता सागरांच्या कथामधून चित्रित झालेल्या स्त्री समस्या ह्या ग्रामीण तसेच शहरी भागातील स्त्रियांच्या तर आहेतच; पण त्याच बरोबर डोंबारी, फासेपारधी, नंदीवाले, रोहिले, गारूडी अशा भटक्या जमातीतील स्त्रियांच्याही आहेत. तसेच वर्षानुवर्ष शारीरिक अत्याचार सहन करणाऱ्या वेश्या, जोगतीणींच्याही आहेत.चारुता सागर यांच्या कथा विषयाचा केंद्रभाग हा स्त्रियांचे दुःख असल्याने तोच अधिक स्पष्टपणे जाणवतो. त्यांनी आपल्या सूक्ष्म निरीक्षणातून स्त्रियांच्या अंतरंगातील दुःखांचा तळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे, याबाबत महावीर जोंधळे म्हणतात, "शेती

बदलली. जुनाट अवजारांनी नव्या सुधारणा स्वीकारल्या, त्यातून आर्थिक व्यवहार बदलले. शहरे फुगली, खेडी ओस पडली, असे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न मराठी वाङ्.मयात आले. परंतु स्त्रीच्या पदरात रूढी - परंपरेने, पुरूष संस्कृतीने टाकलेल्या दुःखाला बोलके करण्याचे काम फार कमी साहित्यिकांनी केले. यापैकी प्रमुख नाव म्हणजे चारुता सागर. स्त्री जीतीला सुद्धा आपली सल एवढया समर्थपणे व प्रगल्भ जाणिवेने मांडता आलेली नाही."[२४]

चारुता सागरांनी चिरेबंदी वाडयात राहणाऱ्या स्त्री समस्येपासून ते भटक्या सनाजातील पालात राहणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांचे चित्रण केले आहे. या स्त्रियांच्या वाट्याला सासुरवास, अत्याचार, प्रेमसंबंध, भूक, पती पसंत नसणे, वैधव्य इ. विविध समस्यांना तोंड देतात. काही स्त्रिया आपल्या वाट्याला आलेल्या समस्येविरूद्ध बंड करतात; तर काही स्त्रिया ते दुःख निमूटपणे सहन करत जगतात. याचा अर्थ तिचे मन कुमकवत आहे असे नाही. आईबापाचे नाव खराब होण्यापेक्षा आपणच संपवून घेतलेले काय वाईट असे वाटणे साहजिकच आहे. खेडयापाडयातील पोरींच्या मनात आजही आईवडिलांविषयीचा भाव अतिशय प्रेमाचा आहे; कारण या पोरीबाळींनी बघितलेले जग मर्यादित असते.

चारुता सागरांनी चित्रित केलेल्या स्त्रियांच्या समस्या या प्रातिनिधीक असल्या तरी त्या विविध सामाजिक प्रश्नच मांडताना दिसतात. पुरूष संस्कृतीने स्त्री जीवनावर केलेल्या अन्यायाला वाट मोकळी करून देण्याचे कामाच चारुता सागरांनी केले आहे. याबाबत महावीर जोंधळे म्हणतात, "पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीचे आधिकाधिक शोषण कसे होईल. याचाच विचार लोकसमाजामधून निमार्ण झालेल्या विधी वैकल्यातून होत राहिले. चारुता सागर यांच्या कथा वाचल्या नंतर सण, विण, पूजाअर्चा सर्व दोरीने ती अधिकाधिक बांधून घेत गेली. शोषणासाठीच हे विधी निमार्ण केले गेले का, असा प्रश्न या लेखकाच्या मनात सातत्याने पिगां धरत असावा, त्यामुळेच कथा वाचताना मन बेचैन होते, अस्वस्थ होते आणि आशयाच्या मुळाशी वाचकाला घेऊन जाते. "[२१]

चारुता सागरांनी आपल्या कथांमधुन चित्रित केलेल्या स्त्री जीवनातील समस्या व त्यावरील सुचविलेले उपाय हे प्रत्यक्ष समाजजीवनातदृष्टीस येणारे आहेत. या समस्या व उपाय त्यांनी कलात्मक सत्याच्या रुपात मांडले आहे.

## प्रकरण - चार

## संदर्भ


१ जोंधळे महावीर : 'स्त्रियांचे चिरेबंदी दुःख' संपादकीय लेख, दै. लोकमत, १ डिसें.२००१, पृष्ठ - ४

२. चारुता सागर : 'बुद्धवाङ्यातील भूक', नदीपार, रोही प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, १९७६. पृष्ठ - १

३ चारूता सागर : 'भूक,' नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती. १९९१ पृष्ठ - १३५

४ चारुता सागर : 'बुद्धवाङ्यातील भूक,' नदीपार, रोही प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती - १९७३ पृष्ठ - ३,४

५ चारुता सागर : 'भूक,' नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई तृतीय आवृत्ती. १९९१. पृष्ठ - १३६

६ जोंधळे महावीर : 'उपेक्षित समाजाचे वास्तव 'दर्शन' घडविणारा साहेत्यिक', दै.लोकमत - रविवार विशेष, २ डिसें २००१, पृष्ठ - ४

७ चारुता सागर : 'ओटी' मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, मार्च १९८६, पृष्ठ - २४

८ चारुता सागर : 'बाबा, मला क्षमा करा,' मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, मार्च १९८६ पृष्ठ - ७८

९ चारुता सागर : 'ओटी,' मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती, मार्च १९८६, पृष्ठ - २४.

१० चारुता सागर : 'किंकाळी,' नदीपार, रोही प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७६. पृष्ठ - १२०

११ चारुता सागर : 'धुणं,' नदीपार, रोही प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७६, पृष्ठ - ४७, ४८.

१२ चारुता सागर : 'मामाचा वाडा,' मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.
प्रथमावृत्ती, मार्च १९८६, पृष्ठ - १३८

१३ चारुता सागर : 'रैतुना,' मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती,
मार्च १९८६, पृष्ठ - ३५

१४ चारुता सागर : 'पेटलेला क्षण', मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती,
मार्च १९८६, पृष्ठ - ७

१५ चारुता सागर : 'सावित्री,' मामाचा वाडा, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती,
मार्च १९८६, पृष्ठ - ८८

१६ चारुता सागर : 'असेही दिवस,' नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, तृतीय आवृत्ती,
१९९१, पृष्ठ - १६३

१७ चारुता सागर : 'भूक,' नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, तृतीया आवृत्ती, १९९१
पृष्ठ - १३९.

१८ चारुता सागर : 'दर्शन,' नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, तृतीय आवत्ती, १९९१,
पृष्ठ - १२५

१९ चारुता सागर : 'दावं,' नागीण, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती, १९९१,
पृष्ठ - २८

२० जोंधळे महावीर : 'स्त्रियांचे चिरेबंदी दुःख', दै.लोकमत - संपादकीय, १ डिसे.,२००१,
पृष्ठ - ४

२१ जोंधळे महावीर : 'उपेक्षित समाजाचे वास्तव 'दर्शन' घडविणारा साहित्यिक',
दै.लोकमत, रविवार विशेष, २ डिंसे.२००१, पृष्ठ - ४